# वारस अर्ज नं. ६/२०२४ मधील नि.क्र.३४ वरील आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज सामनेवाला यांनी त्यांचे विरुध्द झालेला उलटतपास नाहीचा आदेश रद्द करण्यासाठी दिलेला आहे.

२. सामनेवाली यांनी अर्जात नमूद केले आहे की, अर्जदार हिने तिची साक्ष निशाणी क्र. १७ वर नोंदविली आहे व तिचेतर्फे मुखत्यार राजश्री संभाजी फडतरे हिचे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र निशाणी क्र. २१ वर दाखल केले आहे. दिनांक १०.१०.२०२५ रोजी सामनेवाली व त्यांचे विधिज्ञ गैरहजर असल्यामुळे निशाणी क्र. २१ वर उलटतपास नाही असा आदेश पारित झालेला आहे. सामनेवाली ही मागील तारखेस आजारी होती. त्यामुळे न्यायालयात हजर राहू शकली नाही. अर्जाचा गुणावगुणावर निर्णय होण्यासाठी अर्जदार हिचा उलटतपास घेण्याची संधी सामनेवाली यांना मिळणे आवश्यक आहे. सबब त्यांचे विरुध्द झालेला उलटतपास नाहीचा आदेश रद्द करण्याची विनंती केली आहे.

३. अर्जदार यांनी सदर अर्जास म्हणणे दाखल करुन हरकत घेतली. अर्जदार असे कथन करतो की, अर्जात नमूद कारण खोटे आहे. सामनेवाली यांनी मुद्दामहून उलटतपास घेतला नाही. अर्जदार यांना केवळ त्रास देणेचा उद्देशाने उलटतपास घेतलेला नाही. सबब अर्ज खर्चासह नामंजूर करावा.

३. प्रतिपक्षांच्या परस्पर विरोधी कथनांवरुन माझे समोर खालील मुद्दे उपस्थित होतात. मी त्यावरील माझे निष्कर्ष कारणांस त्यापुढे देत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | सामनेवाली यांनी मागणी केल्यानुसार उलटतपास नाही हा आदेश रद्द होवून मिळणेस पात्र आहे का ? | **होय.** |
| २ | आदेश काय ? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## का र ण मी मां सा

४. अर्जदार व सामनेवाली यांच्या विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज वारस दाखला मिळण्यासाठी दाखला आहे. अर्जदारातर्फे मुखत्यार राजश्री संभाजी फडतरे यांचे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र निशाणी क्र. २१ वर दाखल आहे. दिनांक १०.१०.२०२५ रोजी सामनेवाला़विरुध उलटतपास नाही असा आदेश झालेला आहे. वादातील मुददा गुणदोषावर निकाली करण्यासाठी सामनेवालीस उलटतपासाची संधी देणे गरजेचे आहे. तसेच सामनेवालीवर विलंबासाठी खर्च बसवणे योग्य आहे. सबब मुद्दा नं.१ होकारार्थी देऊन मुद्दा नं.२ साठी खालील आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१. अर्ज मंजूर करणेत आहे.

२. सामनेवालीने रक्कम रुपये ५००/- खर्च म्हणून अर्जदारास देण्याच्या अटीवर अर्जदाराचा साक्षीदाराचा उलटतपास घेण्याची परवानगी देण्यात येत आहे.

VAIBHAV BAJRANG GHADAGE
Digitally signed by VAIBHAV BAJRANG GHADAGE
Date: 2025.10.31 16:13:49 +0530

**(व्ही.बी.घाडगे)**

दिनांकः- ३१.१०.२०२५ दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर,वडूज.